स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावकक्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :** ०६/०८/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिका

*सर्व नागरिकांनी “हर घर तिरंगा” मोहिमेत सहभागी होण्याचे महानगरपालिकेचे आवाहन*

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून “हर घर तिरंगा” ही मोहीम सुरु करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता वाढविणे हा या मोहिमेचा मूळ उद्देश आहे. सन २०२५ मध्ये सुद्धा “हर घर तिरंगा” ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविणेत येत आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व नागरिकांनी दि.०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत भारताचा तिरंगा ध्वज आपल्या घरावर, इमारतींवर, आस्थापनांवर फडकवावा. तसेच नागरिकांनी तिरंग्यासोबत सेल्फी घेऊन harghartiranga.com या संकेतस्थळावर सेल्फीज/फोटो अपलोड करावेत व संकेतस्थळावर सेल्फीज/फोटो अपलोड झाल्यानंतर मोहिमेत सहभागी झाल्याबाबतचे प्राप्त होणारे प्रमाणपत्र #HarGharTiranga, #Har Ghar Tiranga2025 या टॅगसह शेअर करावे.

नागरिकांनी ध्वज फडकविताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही प्रकारे जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही याबाबत सर्व नागरीकांनी दक्षता घ्यावी. www.harghartiranga.com यावर Flag Hoisting Guidelines या सदराखाली राष्ट्रध्वज कसा फडकवावा याबाबतचे व्हिडीओ (videos) उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिकेमार्फत या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येत असून “हर घर तिरंगा” या राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपले तिरंग्याविषयीचे प्रेम अभिव्यक्त करण्याचे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.